IMPACT FACTOR 5.473(SJIF)
UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal
ISSN 2455-4375

# ह.मो. मराठे यांची काळेशार पाणी कादंबरी : आकलन व आस्वाद

**डॉ. प्रशांत रामदासजी राऊत**
सहायक प्राध्यापक
नुतन आदर्श कला, वाणिज्य आणि
श्रीमती म.ह.वेगड विज्ञान महाविद्यालय,
उमरेड जि. नागपूर
९९२१२८४०५६
prashantrt75@gmail.com

**प्रस्तावना :—**

'काळेशार पाणी' ही कादंबरी सर्वात आधी १९६० साली 'साधना' साप्ताहिकाच्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. पुस्तकरुपात ही 'नीलकंठ प्रकाशन' चे (पुणे) प्रकाश रानडे यांनी छापली. या कांदबरीची चर्चा गेली चाळीस वर्षे मराठी साहित्यसृष्टीत होत आहे. या कादंबरीने १९७० च्या सुमारास मराठी साहित्यसृष्टीत वादळ निर्माण केले. महाराष्ट्र सरकारने अश्लीलतेचा खटला भरण्याचीही तयारी चालवली होती. पण तो प्रत्यक्षात चालला नाही. आज चाळीस वर्षानंतर या कादंबरीने उठविलेले उलटसुलट चर्चेचे वादळ शमलेले असून तिची साहित्यिक गुणवत्ता आणि मराठी कादंबरीच्या इतिहासातील तिचे स्थान निर्वावादपणे सिद्ध झालेले आहे.

**कादंबरीची निर्मितीप्रक्रिया :—**

'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी या कादंबरीचा बोलबाला झाल्यामुळे असेल किंवा त्यांच्या लेखनाविशयक आस्था वाटल्यामुळे असेल, शंकर सारडा यांनी दिवाळी अंकासाठी ह. मो. मराठे यांना पुन्हा गोष्ट लिहिण्याची सूचना केली. तेव्हा ती गोष्ट लिहिण्यासाठी लेखक एका संध्याकाळी बसले. मनासमोर एक मुलगी होती, त्या मुलीची सगळी हकिकत त्यांच्या मनात फार खोलवर घुसून बसलेली होती—गेली काही वर्षे. ती मुलगी प्राथमिक शाळेत त्यांच्याबरोबर होती. अंगाने थोराड इतर मुलींच्यात थोडी मोठी दिसणारी. तरतरीत पण वर्णाने काळी. अभ्यासात फारशी हुशार नव्हती. एकूणनच या कांदबरीचे कथानक म्हणजे लेखकाने त्यांच्या जीवनात अनुभवलेले, बघितलेले क्षण. गोष्टीचे कागद लिहून झाल्यावर 'कमळी' म्हणजे या कांदबरीची नायिका तिची नवी गोष्ट भराभरा लेखक लिहू लागले. त्यांनाही भयचकित करुन सोडणारा खेळ अवघ्या पाचसहा बैठकांत लिहून झाला. कमळीची आई तिला—त्या मरण घातलेल्या जिवंत गोळ्याला उचलते आणि मध्यरात्रीच्या काळोखातून नेऊन खोल विहिरीत फेकून देते. ही घटना जेव्हा सुचली तेव्हा लेखक स्वत:च थरारुन गेले आणि भयभीतही झाले. हा प्रसंग ते लिहीत होते ती मध्यरात्रीची दीडदोनची वेळ होती. अशा तऱ्हेने एकामागोमाग त्यांच्या घटना व प्रसंग सुचत गेले व ते लिहित आले आणि साधनेच्या दिवाळी अंकात 'काळेशार पाणी' प्रसिद्ध झाली.

**कथानक :—**

या कांदबरीमध्ये बारा—चौदा वर्षाच्या अल्लड निरागस कमळीची कहाणी आहे. फुलराणी व्हायची स्वप्ने बघणाऱ्या, स्वप्नातला राजकुमार भेटण्यासाठी आसुसणाऱ्या कमळीचे ते स्वप्न अवेळीच भंग पावते. कारण कमळी ही एका गरीब रखेलीची मुलगी आहे. नवरा अकाली मेल्यावर कमळीच्या आईने म्हणजे

भिकीने विष्णु भट याला धगड म्हणून निवडले. त्यांची रखेली म्हणून ती राहु लागली. त्याची वासना वेळी अवेळी पुरवू लागली. भजी विकण्याची टपरी काढून कसेबसे आपले व दोन ते बारा वर्षे वयातल्या अपत्यांचे पोट ती भरु पाहते. कमळी ही तिची नवऱ्यापासूनची मुलगी. मोठी...... तिनेही एखादा पैसेवाला तरुण धगड म्हणून निवडून आरामात जगावे ही भिकीची आकांक्षा. मुंबईतून सामंत नावाचा मुलगा तिच्याच वर्गात येतो आणि त्याचे तिला आकर्षण वाटते. भिकीचा धगड विश्ण्या अचानक मरण पावतो. ती दुसऱ्या एकाला, बाळ्या भटाला जवळ करते. कमळीने सामंतला कवटाळले, भूल पाडावी म्हणून भिकी तिला आपले वशीकरणशास्त्राचे कानमंत्र देते. एकदा कमळी तसा प्रयत्न करीत असताना भिकीही त्याला जवळ घेऊन घट्ट आवळते. त्याच्या गळ्यातला कंठ काढून घेते. त्या स्पर्शाने सामंत सैरभैर होतो. अनुभुत वासनांनी पेटून उठतो. तो परीक्षेत नापास होतो. डोहात जाऊन जीव देतो. नंतर जेव्हा भिकीच्या नव्या धगडाला संभोगाचा आनंद मिळत नाही, तो वैतागाने म्हणतो, 'ढकलून दे कमळीला विहिरीत' तेव्हा भिकी भीतीने थरथरणाऱ्या कमळीला विहिरीत लोटून देते. काळ्याशार पाण्यातून धप्प असा आवाज घुमत येतो. अशी ही एक निरागस, भाबडी प्रेमकथा शोकात्मतेकडे जाणारी आहे.

**आशय :—**

डॉ. पुष्पा राजपुरे यांनी या कादंबरीचे आशयसूत्र आपल्या परीने निश्चित केले आहे. ''पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्रीदेहाचा समाजरचित अर्थ कळण्यापूर्वीच देहमनावर झालेला भोगविलासाचा संस्कार एका मुलीला विनाशापर्यंत घेऊन जातो आणि त्यातच तिचा भयावह अंत होतो. मात्र तिच्या मृत्यूने तिच्या आप्तस्वकीयांच्या जीवनाला एक विचित्र मुक्तता लाभते.''[१]

**व्यक्तिरेखा :—**

**१. कमळी**

बारा—तेरा वर्षाची कमळी ही व्यक्तिरेखा या कलाकृतीत केंद्रस्थानी आहे. तिची आई भिकी आणि तिची भावंडे, आईचा धगड व आर्थिक दैन्यावस्था या सर्वांचा परीघ तिच्या जीवनाला व्यापून उरलेला आहे. विष्ण्याने ठेवलेल्या बाईची म्हणजे भिकीची मुलगी. म्हणून समाजाच्या दृष्टीने रांडेची मुलगी. शाळेतले शिक्षक सहविद्यार्थी तिच्याकडे त्याच नजरेने बघतात. मुंबईहून आलेला सामंत हा हुशार क्रीडापटू विद्यार्थी मात्र तिच्याशी मोकळेपणाने बोलतो. तिला अभ्यासात मदत करतो. त्यामुळे शाळेत तिच्या 'असण्या' ला नवा अर्थ लाभतो. तिला त्याच्याबद्दल आकर्षण वाटते. ''हे आकर्षण शरीर नाही; तर त्यात माणूस होण्याचा मार्ग दडलेला आहे.''[२] याकडे डॉ. राजापुरे आपले लक्ष वेधतात.

**२. भिकी**

भिकी ही विष्ण्याची ठेवलेली बाई. रखेली. रखेलीचे समाजातील स्थान पुरुषच ठरवतात; आणि याच पुरुषधार्जिण्या नजरेतून स्त्रियाही रखेलीकडे पाहतात. तिला कुलटा ठरवतात. भिकीच्या भोगवट्याचे, हलाखीचे, अगितिकतेचे, अवमानाचे अनेक प्रसंग कथावस्तूत गुंफले गेलेले आढळतात. भिकीचे शोषण, भिकीचे दु:ख समाजाच्या लेखी बोथट, झिजट होऊन गेलेले असते. विष्णुचे निधन झाल्यावर त्याच्या बायकोला मिळणारी समाजाची वागणूक आणि त्याच्या रखेलीला मिळणारी समाजाची वागणूक यात कमालीची तफावत दिसते. बायकोबद्दल सहानुभूती तर भिकीबद्दल तिरस्कार. विवाहित स्त्रीचे शोषण समाजाला कळते. पण विवाहबाह्य संबंध ठेवणाऱ्या स्त्रीचे शोषण कळत नाही. या दोहोतला फरक या

लघुकादंबरीतील घटनांमधून जाणवत राहतो. कमळीलाही आपल्यासारख्या धगड, पण श्रीमंत, मिळून तिचे जीवन मार्गी लागावे. ही भिकीची मर्यादित माफक आकांक्षा. भिकी कमळीवर रखेल होण्याचे संस्कार करते. आपले शरीर भांडवल म्हणून वापरण्यावाचून भिकीला गत्यंतरच नसते. विष्ण्या गेला; डोळा ठेवून असतो, पण भिकीच्या म्हाताऱ्या देहाचा भोग घेत कमळीलाही कुस्करु पाहतो.

**३. विष्णु**

विष्णु हा भिकीचा धगड, भिकीचा हडकुळा नवरा गेल्यावर तिला विष्णुने ठेवले आहे. भिकी अंगाने भरदार आहे. विष्णुही भरदार अंगाचा, गावचा मानकरी. या विष्णुच्या पोटापाण्याचा, उद्योगाचा कादंबरीत उल्लेख नाही. थोडाफार शेती करीत असावा. भिकी घरचा पाळणा सतत हलता ठेवनं हीच विष्णुची कर्तबगारी दिसते. त्याने भिकीच्या पदरात दहा पोरं. घातली आणि त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारीही. मुलांच्या पालन—पोषणाचा दिवसाचा आणि विष्ण्याचा रात्रीचा भार असह्य एका तिन्ही सांजेला भिकीचा स्फोट होतो. दुर्दैवाने त्याच दिवशी विष्णु बाहेरुन मार खाऊन आलेला असतो. त्यातच भिकीचा शाब्दिक मार: ती रौद्र रुप धारण करते. दोघांचे कडाक्याचं भांडण हाते. तो तापाने फणफणलेल्या अवस्थेतच तिरीमिरीत घरी जाऊन पाठीवरुन तांदळाची गोण आणतो. आणि दरवाजात टाकतो. स्वत:च शरीरही तिथेच टाकतो.

**४. बाळंभट**

विष्णु मरतो. भिकीकडे बाळंभट येऊ लागतो. त्यांचे थोडे थोडे चाळे कमळीच्या समोर होऊ लागतात आणि कमळीलाही 'ती' अक्कल येऊ लागते. बाळ्याभटामुळे कमळी सामंतच्या जवळ गेली आणि बाळ्याभट हे पात्र कमळीला गैरवर्तन करण्यास भाग पाडणारे आहे.

**५. सामंत**

सामंत विर रसाचं प्रतीक आहे वर्गाला तो स्वत:च्या बळावर सामने जिंकून देतोच; पण एरवी वाळीत पडलेल्या एका मुलीच्या जीवनाला अर्थ प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न करतो. सामंतमुळे कमळीला अभ्यासाची गोडी लागते. त्याच सामंतच्या परीक्षेतील अपयशाला आणि जीवनातही अजाणतेपणी कमळीच कारणीभूत होते. ''सामंत भिकीला ताज्या ताज्या माशासारखा चमकता आणि रसरशीत दिसला. मरत चाललेल्या झाडाला पाणी मिळताच तरतरी यावी तसं 'भुकेने' कुरतडलेलं तिच शरीर सामंतासाठी हावरं झाल.''[३] असे सुधीर सुरवठणकर म्हणतात.

**कादंबरीतील प्रतिमा :—**

ही कहाणी घडते याच मालवणी/कोकणी परिसरात. 'काळेशार पाणी' ही प्रतिमा या प्रदेशाशी निगडित आहे. कुळागर, अहाळ, कोंड (भताची) विहीर (महापुरुषाची), डोंगर (देवचाराचा), झाडामागचं झाकोळ काळ्याभोर किर्रर सावल्या (भुताच्या पंचासारख्या), काळे खडक (राक्षसाच्या जिभेसारखे), गरगरणारा पाण्याचा भोवरा, भयाण, अंधार, जडजड वातावरणाच्या तपशीलातून ही प्रतिमा गडद होत जाते.

**निवेदन :—**

भावच्छटेनुरुप बदलत जाणारी प्रतिमात्य निवेदनशैली हे या कादंबरीचे मनोज्ञ वैशिष्ट्य. अंधार सावलीचं गूढ जाणवून देणारे स्थलनिर्देश जसे इथे आहेत, तशी कमळीची भुकेली अवस्था तिला आणि

सामंताला लागलेली मुग्ध प्रेमाची चाहुल पात्रांच्या संवादासाठी मालवणी बोलीचा वापर करतांना निवेदनात धगड, न्हवरो, कुस्कुटख म्हामदा, झिल, गाळी, तरास ह्यसंर, मिया माथ्यार (माथ्यावर) मुड्यर (मढ्यवर) असे काही शब्द आले आहेत.

**भाषा :–**

कादंबरीची भाषा आशयानुसार बदलणारी आहे. पात्रांचे मनोधर्म, प्रसंगाची निकड, पात्रांमधील विरोध, पात्रांचे विकार यानुसार निवेदनाची भाषा बदलत राहते. –'थंड पाण्याची धार अंगावर पडताचे जसं थरथरायला होतं तशी कमळी सामंताच्या मामाचा हात पाठीवरुन, केसावरुन फिरतांना सगळ्या अंगावर थरथरुन गेली. विहीर काठोकाठ भरावी तशी भरुन गेली. (पृ. ७९) साटमाच्या हातांचा आपल्या छातीला होणारा स्पर्श आपण मुद्दाम सामंताच्या मनगटाला केलेला स्पर्श. हिरव्यागार, लुसलुशीत गवतावरुन तळहात फिरवताना वाटते तसं तिला वाटत होतं. हिरव्यागार गालिच्यासारख्या त्या स्पर्शाची एकमेकांतली मिसळणं तिच्या हृदयातून वीज होऊन पायांच्या दिशेला सरकत होती. (पृ. ८५), 'तीन दिवसांपूर्वी विष्ण्या मेल्याचं बघितल्यापासून तिला जराही रडू आलं नव्हंत. पण सामन्ताच्या या प्रश्नांन ती एखाद्या भरलेल्या घागरीसारखी डचमुख गेली.' (पृ. ७६). डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात. ''भाषेला सर्जनशील सहजपणे करण्याचं प्रचंड सामर्थ्य चि. त्र्यं. खानोलकरांकडे होतं तसंच ते. ह.मो. मराठे यांनाही प्राप्त झालं आहे. भोवतालच चित्रमय वर्णन अतिशय नेमक्या नेटक्या आणि अटळ शब्दांत आशय व्यक्त करताना जाणवणारा प्रभावी सफाईदारपणा प्रत्येक शब्दाचा अर्थ आणि ध्वनीसहित योजकपणे वापर करतानाही दिसणारी सहजता, ललित लेखनात जाणवत राहणारी गद्याची अशी एक लय सांभाळत लिहिण्याचं कौशल्य, लेखननिविष्ट पात्रांचे स्वभाव, मनातले प्रकट होणारे कल्लोळ, अंतर्मनातील प्रखर, वृत्ती–प्रवृत्ती, मनोदशा वा मनावस्था समर्थपणे व्यक्त करण्याची भाषिक लकब या सर्व वैशिष्ट्यांचा आढळ ह.मो. मराठे यांच्या भाषेत आढळतो.''[४]

**चित्रमय शैली :–**

ह. मो. मराठे यांच्याकडे एका कलावंताला आवश्यक असे मोठे कसब आहे. ते म्हणजे प्रसंग किंवा घटना खुलवून, फुलवून चित्रात्मक शैलीत प्रस्तुत करण्याचे कथेतील प्रसंग शृंगारिक असो, बीभत्स असो, भयानक असो वा करुण असो, ह.मो. मराठे अतिशय खिळवून ठेवणारी मांडणी करतात. त्यांचे हे कसब मराठीत अद्वितीय आहे. कमळी–सामंतचा काहीसा दुरावा आणि नंतरचे मनोमिलन सामंतच्या मनाची उद्विगता आणि आत्महत्या, त्या प्रसंगीची कमळीची मानिसक अस्वस्थता आणि त्यानंतर तिच्या आजारीपणाचे चित्रमय वर्णन तर विलक्षण प्रत्ययकारी आहे. भिकी–बाळ्याभटाचा शृंगार–रस–भंग, भिकीचं कमळीला विहिरीत फेकणं–हे सर्वच प्रसंग मोठ्या ताकदीने डोळ्यांसमोर उभे केले आहेत.

**कलात्मक उंची :–**

अनेक बारकाव्यांच्या साह्याने कादंबरीने कलात्मक उंची गाठली आहे हे सत्य नाकरता येणार नाही. भिकीचे कांद्याच्या भज्याचे 'हॉटेल' आहे. कांदाभजी इथे भिकीच्या संबंधात येणाऱ्या पुरुषांच्या भुकांच प्रतीक म्हणून येतात. आता हे वर्णन पाहा–'भिकी चुलीकडे जाण्यासाठी वळली. तिची लांबट होत जाणारी काळीकुट्टसावली समोरच्या भिंतीवर पसरलेली कमळीनं पाहिली. आणि ती भेदरुन गेली. ती सावली आपल्या अंगावर येत आहे अस तिला वाटलं. वहाळातल्या पाण्याच्या पुराच्या लोंढ्यसारखी ती सावली

कमळीच्या अंगावर झेपावत आली. त्या काळ्या प्रवाहातून पोहत पोहत सामंत आला. कमळीनं त्याला मिठी घातली. पण तो प्रवाहातून वाहात पुढे गेला. भुतांनी त्याला उचलून नेलं......

**कोकणची पार्श्वभूमी :—**

कोकण प्रदेश ही या कादंबरीची पार्श्वभूमी आहे. कथाकाळ किमान चाळीस वर्षापूर्वीचा. त्यावेळी मालवणसारखा ठिकाणी वीज आली असली तरी ती घराघरात पोहचली नव्हती. कादंबरीत भााळेचे वर्णन येते—इमारत मोडकळीस आलेली होती आणि रंग उडून गेला होता. भिंतीचे वाभाडे ठायी निघाले होते. कोकणच्या एकूण दैन्यावस्थेचेच हे चित्रण म्हणायला हवे खेळणाऱ्या पोरांनी कुडाच्या भिंतीला भलीमोठी भगदांड पाडली होती. त्यातून सहज आतबाहेर जात येत असे. भिकीच्या आयुष्यालाही हे वर्णन चपखल बसते. या भगदाडातून सहज वहाळावर येत असे इथे वहाळाचे, भीतीदायक वर्णन येते. त्यातील एका कोंडीला 'भुताची कोंडी' असे नाव आहे.

**कादंबरीचे यशापयश :—**

या कांदबरीचे तरुणवर्गाकडून सर्रास स्वागत झालेले आहे. पण वृद्ध पिढीची सर्रास विरोधी प्रतिक्रिया आहे. ही लैंगिक विषयावरची कादंबरी नसून दारिद्र्यामुळे मानवी जीवनाची जी वातावह होते, त्याविषयीची कादंबरी आहे. ''यातील काही प्रसंग भडक, वासना चाळवणारे अश्लील असल्याचे काही जणांना वाटले आणि पोलिसांकडे त्याबद्दल काही अश्लीलताविरोधक कार्यकर्त्यांनी तक्रारी केल्या. १९७३/७४ मध्ये पालिसांनी पुण्यातील काही साहित्यिकांना व प्राध्यापकांना भेटून 'काळेशार पाणी' अश्लील आहे कार्याबद्दल त्यांच्या प्रतिक्रिया घेतल्या. त्यातील काही जणांनी समाजजीवनाचे भेदक जीवनवास्तव मांडणारी ही एक कलाकृती आहे असे म्हटले. कालांतराने खटला दाखल केला. त्यानंतर प्रत्येकी ४०० रुपयांच्या जामिनावर मुक्तता झाली.''[५] त्याच सुमारास लीला बावडेकर यांनी 'काळेशार पाणी' चा इंग्रजीत अनुवाद केला. 'दि डार्क वॉटर्स' इंडिया बुक हाऊस या प्रकाशन संस्थेने हे पुस्तक प्रसिद्ध केले. 'रेअर लिटररी ॲचिव्हमेंट' म्हणून त्याची प्रशस्ती केली. इंग्रजीतील अनुवाद 'दि इलस्ट्रेटेड वीकली ऑफ इंडिया' मध्ये तीन भागांत प्रसिद्ध झाला. त्याला भारतभरच्या वाचकांकडून उत्साहवर्धक दाद मिळाली. दहाबारा वाचकांनी पत्रे वीकलीमध्ये प्रसिद्ध केली. एका अगदीच वेगळ्यच जगाचे व चित्रण बहुसंख्य वाचकांना अभिनव वास्तव अंतर्भेदक वाटले. पुढे पुष्कराज परांजपे या नव्या दमाच्या तरुणाने 'डोळं' हा 'काळेशार पाणी' वर आधारित चित्रपट काढला. जानेवारी २००८ च्या पहिल्या आठवड्यात हा चित्रपट मल्टिप्लेक्समध्ये झळकला. चित्रपटात कमळीला मांत्रिकाने भूतबाधा उतरवण्यासाठी केलेल्या प्रयत्नात मृत्यू येतो असे दाखवले आहे. तिच्या चित्राला युनोस्कोच्या चित्रकला स्पर्धेत दहा हजारांचा पुरस्कार आणि परदेशवारीचे विमानाचे तिकीट हे त्याच वेळी येते. पण त्यावेळी कमळी जिवंत नसते, असे दाखवून दैवदुर्विलासाचा भीषण खेळ दाखवला आहे. 'काळेशार पाणी' च्या मूळ कथावस्तूचे आवाहन आणि आकर्षण पस्तीस—चाळीस वर्षानंतरही तरुण कलावंताना सामर्थ्याची निदर्शक आहे.

**मूल्यमापन :—**

डॉ. रमेश धोंगडे म्हणतात, ''कणव निर्माण करणे आणि घटनेभोवती काव्यात्मकतेचे वलय निर्माण करणे यात भाषेच्या योग्य उपयोजनातील अपयशामुळे आलेली बाधा, शिशूमनावर अभावितपणे झालेले प्रौढ मनाचे वर्चस्व, घटनांच्या कारण परंपरेतील असंभवनीयता, संवादातील बालिशपणा आणि बोलींची

सरमिसळ, कालसंदर्भाच्या अभावामुळे खुंटलेला व्यक्तिविकास आणि मनोवस्तवाची पार्श्वभूमी नसलेल्या केवळ लैंगिक कृतींचा बटबटीत घटनाक्रम ही या कादंबरीची शैलीतील कमकुवत स्थाने आहेत.''[६] डॉ. आनंद पाटील म्हणतात, ''सबाल्टर्न स्टडीजच्या परिभाषेत भिकी आणि कमळी यांची शोकांतिका ही राष्ट्राचे प्रतीक म्हणून मांडता येते असे ते दाखवून देतात.''[७]

निवेदक विष्णुच्या पत्निविषयी फारशी माहिती पुरवत नाही. तिचा नवरा रोज रात्री भिकीच्या घरी असायचा. यांचे निवेदन करणारा निवेदक विष्णुच्या या वर्तनाचा तिच्या भावी जीवनावर होणारा परिणाम कुठेही कथन करीत नाही. मुंबईहून आलेला सामंत झरझर झाडावर चढतो हेही काहीस अवास्तव वाटतं. त्याचप्रमाणे तब्येत सुधारण्यासाठी मुद्दाम गावी आलेला आजारी सामंत प्रतिस्पर्धी संघातल्या गावच्या सर्व रांगड्या मुलांना सहज वाद करतो हेही काहीसं अनाकलनीयच. भुकेकंगाल कोकणमधील सर्वच मुलं कुपोषणग्रस्त असतील असं मानणंदेखील काहीसं जडच जातं. एरवी अत्यंत वास्तव उतरलेल्या या कादंबरीतील हे कच्चे दुवे वाटतात.

**संदर्भ टीपा :**

१. संपा, शंकर सारडा, 'काळेशार पाणी : संहिता व समीक्षा', २००८, डिंपल पब्लिकेशन, ठाणे, पृ. २९.
२. उ. नि. पृ. ३०.
३. उ. नि. पृ. २३३.
४. उ. नि. पृ. २१०.
५. उ. नि. पृ. २५.
६. उ. नि. पृ. ३२.
७. उ. नि. पृ. ३४.